DYP DPU
Dr. D. Y. Patil Public School

Dr. D. Y. Patil Unitech Society's
**DR. D. Y. PATIL PUBLIC SCHOOL**
**PIMPRI, PUNE - 411018.**
Recipient of the 'Best School Award' PCMC
Recognised by Govt. of Maharashtra (CBSE Affiliation No. 1130679)

| Dr. P. D. Patil | Dr. Bhagyashree Patil | Dr. Somnath Patil | Mrs. Vineeta Pandey |
|---|---|---|---|
| Chairman | Vice Chairperson | Secretary | Principal |

Ref. No. : DYP|PS|263|2025-26 Date : 24|02|2026

मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
पुणे जिल्हा परिषद,
पुणे.

विषय ः- स्व मान्यता प्रस्तावाच्या त्रुटींबाबत

संदर्भ ः- नमुना २ मागणी ऑनलाईन अर्ज कमांक २०२३८६०४७७७७

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार, आम्ही सादर केलेल्या स्व मान्यता प्रस्तावए सन २०२५-२०२८ मध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत त्याचा खुलासा खालील प्रमाणे करत आहोत.

१ शाळा स्वयंअर्थसहाय्यित असून, कायम विनाअनुदानित नमूद केले आहे.

आमची शाळा मान्यता घेताना कायम विनाअनुदानित तत्वावर परवानगी मिळाली आहे. त्याप्रमाणे मान्यता आदेशात नमूद केलेले आहे. परंतु कालांतराने कायम विनाअनुदानित हा शब्द वगळून त्या ऐवजी स्वयंअर्थ सहाय्यित हा शब्द लागू झाला. त्याप्रमाणे सदयस्तिथिला ऑनलाईन सर्व प्रकारची महिती भरताना स्वयंअर्थ सहाय्यित हाच शब्द वापरला जातो.

२ मुलींसाठी मुतारींची संख्या कमी आहे.

मुलींसाठी मुतारींची संख्या १५ आहे आणि सर्व मुतारी योग्य स्थितीत वापरात आहे.

३ शासन निर्णयानुसार शाळेचे नाव नमुद करणे आवश्यक आहे.

शासन मान्यतेच्या काही आदेशांमध्ये डॉ. डी. वाय. पाटील स्कुल व काही आदेशांमध्ये डॉ. डी. वाय. पाटील पब्लिक स्कुल असे नमुद केलेले आहे. परंतु आमच्या शाळेचे सुरूवातीपासुनचे नाव हे डॉ. डी. वाय. पाटील पब्लिक स्कुल असेच आहे. शासनाच्या ऑनलाईन सरल व युडायस पोर्टलवर सुदधा डॉ. डी. वाय. पाटील पब्लिक स्कुल हेच नाव आहे.

"यशवंतराव चव्हाण भवन "
जिल्हा परिषद पुणे. शिक्षण माध्यमिक
शिक्षण/माध्य/इ-४/प्रथम मान्यता/९७-९८.
पुणे दि. ८।१०।९७.

प्रति, **BOOK-POST**

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
डी-वाय. पाटील स्कूल, पिंपरी. पुणे १८.

विषय :- इ.१०वी वर्गास प्रथम मान्यता सन ९७-९८.

संदर्भ :- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे कडील पत्र क्र. माध्य ३/प्रथम मान्यता/पुवि/९७. दि.२३।६।९७.

24.11.97

उपरोक्त विषयसंदर्भान्वये आपल्या डी-वाय. पाटील स्कूल, पिंपरी. पुणे ~~मराठी/इंग्रजी~~ माध्यमाच्या माध्यमिक विद्यालयातील इयत्ता १०वी च्या वर्गास खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर सन १९९७ - ९८ या शैक्षणिक वर्षापासून प्रथम मान्यता देणेत येत आहे.

20.1.97

१] संस्थेने मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर उपलब्ध करावे.
६] पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन द्यावा.
७] शैक्षणिक, कार्यानुभव, व क्रीडा साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
८] शैक्षणिक साहित्याचा अध्यापनात वापर असावा.
९] स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करुन द्यावी.
१०] वाढीव फीचे दर मा. शि. संचालक, महरा. पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
११] माध्यमिक शाळा संहितेनुसार शालेय रेकॉर्ड असावे.
१२] कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
१३] शिक्षकांचा भविष्य निर्वाह निधी.. खाती उघडावीत.
१४] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करुन घेणेत यावी.
१५] अभ्यासेतर कार्यक्रम, विविध स्पर्धा व परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग असावा.
१६) मुख्या. यांनी लॉगबुक ठेवावे.

J. N. Hade
शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद, पुणे

Inward No. 60

पुवि ९३-९४,
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक:-
14-JUL 1994

प्रति,
सचिव,

डी. वाय. पाटील प्रतिष्ठान
खराळवाडी, संत तुकाराम नगर,
पिंपरी, पुणे-१८

विषय:- सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत

संदर्भ :- एसएसएन-१०९४/३९३७/माशि-१, दि. २२ जून, १९९४.

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करून खालील दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून १९९३ पासुन विना अनुदान तत्वावर/कायम विनाअनुदान तत्वावर "विशेष बाब" म्हणून नवीन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

१] या नवीन माध्यमिक शाळांना [इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त] शासन निर्णय, शिक्षण व सेवा-योजन विभाग क्र. एसएसएन १०८८/१६६९-एन माशि-१, दि. १०/२/८९ अन्वये विहित केलेल्या नवीन सूत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

१] सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशाचे [उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इ. ]काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

२] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

३] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिक दृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [ई. बी. सी. ]फीच्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमी पत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

४] जादा उघडण्यात आलेल्या तुकड्यातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यात यावेत तसेच प्रवेशाच्यावेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्विकारण्यात येवू नये.

५] महाराष्ट्र शैक्षणिक संस्था [प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज] कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी/वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये.

६] माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

..२.

करण्यात येईल.

८] शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी[माध्यमिक] यांचेकडून मंजूर करुन घेण्यात येईल.

९] माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्ययावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

१०] शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इ. बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधांसह ठेवण्यात येईल.

११] माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३. अन्वये मा. शिक्षण संचालक, यांची पूर्व परवानगी शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

इतर अटी:-
=======

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संबंधित संस्थेने कायमस्वरुपी ठेव म्हणून ५०,०००/-[रु.पन्नास हजार फक्त] अनामत रक्कम चलनाद्वारे शासकिय कोषागारात लेखाशिर्ष "०२०२ शिक्षण क्रिडा कला व संस्कृती ०.१. सर्व-साधारण शिक्षण"२०२-माध्यमिक शिक्षण [सकेत क्र. ०२०२००२६]शिक्षण व इतर फी[]०२]शिक्षण फी व इतर फी खाली भरावे.[केवळ इंग्रजी माध्यम शाळांकरिता]

वरील बाबी पैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

| अ.नं. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १] | डी.वाय.पाटील प्रतिष्ठान | पिंपरी चिंचवड | इ. ८वी जून-९३ पासून | इंग्रजी[कायम विना-अनुदानित] |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३.१. नुसार शाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आत विहीत प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यतेकरिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पद्धती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहीत केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

स्थळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रतिलिपी -

१) शिक्षणाधिकारी [माध्यमिक] जिल्हा परिषद **पुणे** यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित.

त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करुन अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा तसेच संस्थेविरुध्द तक्रारी व गैरव्यवहाराची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्या विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर नवीन माध्यमिक शाळेत प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणाऱ्या अधिकाऱ्यांकडून तपासणी करुन आपल्या अभिप्रायासह तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

२) मा. उपसचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२

३) मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीसाठी सादर.

शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८.
दिनांक - २९/१२/२००४.

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

~~डॉ. डी.वाय. पाटील,~~
~~पब्लिक स्कूल, पिंपरी.~~

विषय :- कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचा/ अतिरिक्त तुकडया मंजूर करणे बाबत. [इंग्रजी माध्यम]

संदर्भ :- १] शासन निर्णय क्रमांक व्हीएनएस/१००२/[१०००/०२] /प्राशि-३ दि. १४ जानेवारी २००३.
२] आपणाकडील दि. ८/१०/०४ चा प्रस्ताव.

संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमुद इयत्तांच्या ~~नैसर्गिक~~ / अतिरिक्त तुकडया वर्गांना २००४ - २००५ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ ~~नैसर्गिक~~ / अतिरिक्त | ~~विनाअनुदानित~~ / कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|---|---|
| | डॉ. डी.वाय. पाटील पब्लिक स्कूल पिंपरी | इंग्रजी | इ.१लीचा | अतिरिक्त | इ.१ली वर्ग वर्गासाठी |
| | | | इ.३री व इ.४थी चा | अतिरिक्त | इ.३री व इ.४थी च्या वर्गासाठी |

शाळेने सदरचे वर्ग अथवा तुकडी मंजूरीसाठी खाली नमुद केलेल्या अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१] शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या

२] सदर शाळेने तुकड्यासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन दयावयास हव्यात.

३] सदर शाळेने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सो- चांगली केलेली असावयास हवी.

४] शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

५] सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६] सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

वरील बाबींची पूर्तता करुन लेखी अहवाल एक महिन्यात सादर करावा.

(स्वाक्षरी)
प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - १८.

प्रत :- माहितीसाठी.
१] मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

दिनांक २८/१ /२००४.

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

डॉ. डी. वाय. पाटील,
पब्लिक स्कूल पिंपरी

विषय :- कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचा/ अतिरिक्त तुकडया मंजूर करणे बाबत. [इंग्रजी माध्यम]

संदर्भ :- १] शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस/१००२/[१०००/०२] /प्राशि-३ दि. १४ जानेवारी २००३.
२] आपणाकडील दि. २८/१/०४ चा प्रस्ताव.

संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमुद इयत्ताच्या ~~नैसर्गिक~~ / अतिरिक्त तुकडया वर्गांना २००३ - २००४ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ ~~नैसर्गिक वा~~ अतिरिक्त | ~~विनाअनुदानित~~ / कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|---|---|
| १) | डॉ. डी. वाय. पाटील पब्लिक स्कूल पिंपरी | इंग्रजी | ३-४थी | अतिरिक्त | कायम विना अनुदानित |

Recd on 30.1.04

शाळेने सदरचे वर्ग अथवा तुकडी मंजूरीसाठी खाली नमुद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१] शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेणी व सेवा शर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे. [एस. एस. सी. डी. एड. ] [कि. ना. प. ]

२] सदर शाळेने तुकड्यासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास हव्यात.

३] सदर शाळेने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावयास हवी.

४] शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

५] सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६] सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रदद् करण्यात येईल.

वरील बाबींची पूर्तता करुन लेखी अहवाल एक महिन्यात सादर करावा.

[signature]
प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - १८.

प्रत :- माहितीसाठी.

१] मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

जा.क्र.प्रा/प्राशि/खाप्राशा/जा.तु./पीआर.
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे -१. यांचे कार्यालय.
दिनांक :

2 1 MAR 1998

प्रति,

१] शिक्षणाधिकारी [प्राथमिक],
जिल्हा परिषद, पुणे विभाग.

२] प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ.

३] शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.

विषय : मान्यताप्राप्त ~~अनुदानित~~/~~विनाअनुदानित~~/कायम विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीच्या जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत....

वरील विषयासंबंधीचा आपणांकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळांना त्याचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या नैसर्गिक वाढीच्या प्रथम वर्गास/जादा तुकडीस जून १९९७ पासून ~~अनुदान~~/विनाअनुदान/कायम विनाअनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी/नैस. वाढ. | शेरा/मंजूर |
|---|---|---|---|---|---|
| १) | डी.वाय.पाटील स्कूल पिंपरी | इंग्रजी | इ १लीची | ३री तु | मंजूर |
| | | | इ २रीची | २री व ३री | मंजूर |
| | | | इ ३रीची | २री व ३री | मंजूर |
| | | | इ ४थीची | २री व ३री | मंजूर |
| | | | इ ५वीची | २री व ३री | मंजूर |
| | | | इ ६वीची | २री व ३री | मंजूर |

स्वाक्षरित ... सही नवे

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१. करिता

प्रत: माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
१] मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
डी.वाय.पाटील स्कूल,
पिंपरी १८

D. Y. P. P. S.
Inward No. 84
Date 27/3/98

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ।
दिनांक : ८/४/1998

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
डॉ० बाबू० पाटील स्कूल
पिंपरी पुणे १८

विषय : मान्यता प्राप्त खाजगी ~~अनुदानित~~/विनाअनुदानित प्राथमिक शाळांना नवीन तुकड्या उघडण्यात मान्यता देणे बाबत इ.५वी साठी

संदर्भ : 1. मा. शिक्षण उपसंचालक यांचे कडील जा.क्र. प्रा/प्राशि/खाप्राशा/जातु/नोआर/३२०० दिनांक : २५/३/९८

2/ उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये शाळेच्या मान्यते बाबत माहिती प्राप्त झाली आहे. खाली नमूद केलेल्या जादा तुकडीस/नैसर्गिक वाढीच्या वर्गास जून 1996 पासून ~~अनुदान/विनाअनुदान~~/कायम विनाअनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.
जून १९९८ पासून

| अ.न. | शाळेचे नांव | इयत्ता जादा तुकडी/नैसर्गिक वाढ | शेरा |
|---|---|---|---|
| | डॉ० बाबू० पाटील स्कूल पिंपरी | इ.५वी (इयत्तेत ७वी ची प्रत्येकी २री तुकडी | मंजूर |
| | | इ.६वी ते ७वी ची प्रत्येकी ३री तुकडी | मंजूर |

प्रशासन अधिकारी
शिक्षण मंडळ
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी 18 .

जा. क्र. प्रा/प्राशि/खाप्रा/जा.तु./ (36)
पीआर.
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-२. यांचे कार्यालय. 26
दिनांक :- 15 JUN 1996

प्रति,

१] ~~प्रशासन अधिक~~
१] शिक्षणाधिकारी [प्राथमिक],
जिल्हा परिषद, पुणे विभाग.

२] प्रशासन अधिकारी,
महानगरपालीका/नगरपालिका शिक्षण मंडळ,
~~-----~~ पिंपरी, पुणे १८

३] शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.

विषय :- मान्यताप्राप्त अनुदानित/विनाअनुदानीत/कायम विनाअनुदानीत खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीच्या जादा तुकड्या/वर्ग उघडण्यास परवानगी देणे बाबत........

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळांना त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या नैसर्गिक वाढीच्या प्रथम वर्गास/ जादा तुकडास जून १९९५ पासून ~~अनुदान/विना अनुदान~~/कायम विनाअनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडी/नैस. वाढ | नोरा/मंजूर. |
|---|---|---|---|---|---|
| 1) | डी. वाय. पाटील, पब्लिक स्कूल पिंपरी | इंग्रजी | ५ वी | १ तुकडी | मंजूर |
| | | | ६ वी | १ तुकडी | मंजूर |
| | | | ७ वी | १ तुकडी | मंजूर |

D. Y. P. P. S.
Inward No. 517
Date 20/6/96

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-२.

प्रत- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
१] मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
डी वाय पाटील पब्लिक
स्कूल पिंपरी पुणे-१८